Impact Factor 6.625 E-ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue – 318 (B) April - 2023

## Dr. Babasaheb Ambedkar's Relevance to Inclusive Development in Contemporary India



EDITORIAL BOARD

Guest Editor of the Issue :
Dr. Pramod Herode,
Principal,
Dr. Ambedkar College of Law, Nagsenvana
Aurangabad, Maharashtra .

Executive Editors of the Issue:
Dr. Gatha G. Nerlikar
Mr. Naresh W. Patil
Dr. Shilparani Dongre

Chief Editor :
Dr. Dhanraj T. Dhangar

For Details Visit To : www.researchjourney.net SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

## INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | Dr.B. R. Ambedkar: Views On Democracy In India | Dr. Bhageerathi Naik | 9 |
| 2. | Dr.Babasaheb Ambedkar -Liberator of the Indian Women | Dr. Ramesh Ghegadamal | 13 |
| 3. | Unveiling the Vision of Dr. Babasaheb Ambedkar : A Catalyst for India's Social Transformation | Dr. Devata D. Gasti | 18 |
| 4. | Dr. Babasaheb Ambedkar & Social Reforms | Mr. Deepak Uikey | 22 |
| 5. | Dr. Babasaheb Ambedkar - Philosopher, Farsighted Statesman & Economist | Prof. Subhash B. Naik | 27 |
| 6. | Dr. Babasaheb Ambedkar - India's Greatest Social Reformer | Dr. Sunil Baliram Gaikwad | 31 |
| 7. | Socio-Economic Thoughts of Dr. Bhimrao Ambedkar | Dr. Alok Kumar Singh | 36 |
| 8. | Dr. Babasaheb Ambedkar and Civil Code | Prof. Dr. Daksha Dave | 42 |
| 9. | Dr. Ambedkar as a Pioneer in Women's Empowerment | Dr. Sabhia Kulsum Y. Shaikh | 48 |
| 10. | Dr. Babasaheb Ambedkar : The Major Events of the Life | Dr. Shaikh Mahemood Shaikh Nabi | 53 |
| 11. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एवं महिला सशक्तिकरण | डॉ अजित कुमार | 57 |
| 12. | बाबा साहेब आंबेडकर के लोकतांत्रिक विचार | डॉ. विनी शर्मा | 63 |
| 13. | सामाजिक न्याय एवं समता पर डॉ. अम्बेडकर के विचार | डॉ. श्रीपाल चौहान | 70 |
| 14. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक महान शिक्षविह | डॉ. शाहेदा मुनाफ | 75 |
| 15. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय महिलाओं के मुक्तिदाता | डॉ. शीला सालवी | 79 |
| 16. | अंबेडकर जी के शैक्षिक विचारों का एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रिया पाल | 84 |
| 17. | "भारतीय महिलांचे उद्धारकर्ते"- डॉ. बाबासाहेब आंबेडकर | डॉ. अरुण ल. मोहिते | 89 |
| 18. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजवाद विषयक विचार | डॉ. संजय पाटील | 96 |
| 19. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती संबंधीचे विचार व योगदान | प्रा. विलास मेश्राम | 101 |
| 20. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतातील कामगार चळवळीतील योगदान | डॉ. दिनेश धाकडे | 106 |
| 21. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर :- एक थोर समाजसुधारक | डॉ.अशोक भवर | 111 |
| 22. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन | वर्षा शिंदे | 117 |
| 23. | राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय एकात्मतेवरील डॉ. बाबासाहेब आबेडकरांचा दृष्टीकोण | डॉ. अशोक रा. सलामे | 120 |
| 24. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर - भारतीय महिलांचे स्वातंत्र्य | डॉ.संजय धनविजय | 125 |
| 25. | भारताचे महान समाज सुधारक: डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर | डॉ. माधुरी प्र. पाटील | 132 |




Scanned with OKEN Scanner

Issue - 318 (B) : Dr. Babasaheb Ambedkar's Relevance to Inclusive Development in Contemporary India
'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - 6.625 Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April -2023

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती संबंधीचे विचार व योगदान

**प्रा. विलास मेश्राम**
मराठी विभाग
डॉ.एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पवनी.
vilasmeshram501@gmail.com

**प्रस्तावना:**

*दलितांना आत्मविश्वास आत्मसन्मानाचा प्रकाश देणारे युगंधर बाबासाहेब समग्र दलित जीवनाचे प्रेरणास्थानच. मानव जातीच्या इतिहासात याला तोड नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक अर्थतज्ञ शोषित, पीडित समाजाचे नेते. बुद्ध धम्माचे अनुवर्तक तसेच स्त्रियांच्या व कामगारांच्या हक्कासाठी लढणारे नेते म्हणून ओळखले असले तरी कृषी विषयक समस्यांबाबत आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्य मोलाचे आहे. भारत सर्वात मोठा लोकशाहीचा देश म्हणून जगभरात ओळखला जातो. त्याचबरोबर कृषी प्रधान देश म्हणून सुद्धा ओळखला जातो. भारतीय अर्थव्यवस्था ही बऱ्यापैकी शेतीवर अवलंबून आहे यासाठीच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांचे हित साधणाऱ्या विविध उपाय योजना संदर्भात मार्गदर्शन १०० वर्षांपूर्वीच केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे विद्वान, कायदेतज्ञ, संशोधक, थोर अर्थतज्ञ तसेच अत्यंत अभ्यासू शेतीतज्ञ होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची दूरदृष्टी ही असामान्य होती सण १९४२ ते १९४६ या कालावधीत त्यांनी त्यांच्या अफाट ज्ञानाचा उपयोग भारताच्या प्रगतीसाठी केलेला दिसून येतो.*

**डॉ. आंबेडकर यांचे शेती विषयक विचार:**

कृषीप्रधानतेचा वारसा भारताला अगदी प्राचीन काळापासून लाभलेला आहे. भारतातील सर्वात प्राचीन असलेली सिंधू संस्कृती, नांगर संस्कृती म्हणून ओळखली जाते. या नांगर संस्कृतीचे अवशेष आम्हाला आजही भारताच्या सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक व्यवस्थेत रुजलेले दिसून येतात. प्राचीन काळात शेतीचा शोध लागला आणि भारतातील सामाजिक जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले .याच कृषी व्यवस्थेमुळे स्थिर नागरी व कृषी जीवनाची परंपरा निर्माण झाली. कृषी परंपरेची ही लक्षणे भारतातील अनेक सण आणि उत्सवाच्या माध्यमातून जोपासले जातात. शेतीच्या हंगामी काळात अनेक सणाची निर्मिती कृषीप्रधान जीवनाची व प्रगत कृषी परंपरेची साक्ष देतात.

आधुनिक काळात शेतीसंबंधी तंत्रज्ञान विकसित होत गेले मात्र शेतकऱ्यांच्या शोषणात काहीच फरक पडला नाही. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत होत असलेल्या शेतकऱ्यांच्या शोषणाला कोणीही वाचा फोडली नाही. आधुनिक काळातील समाजसुधारकांना ही शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना दिसल्या नाहीत. मात्र आधुनिक काळातील समाज सुधारक ज्यांनी भारतीय समाज व्यवस्था व वर्ण जातिव्यवस्थेचा अभ्यास केला त्यात प्रामुख्याने महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाची दखल घेतली. शेतकऱ्यांच्या शोषणाला वर्णव्यवस्था कशी जबाबदार आहे याची चिकित्सा करून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न या महामानवांनी केला. सन 1883 मध्ये महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा असुड या ग्रंथात शेतकऱ्यांच्या तत्कालीन दारून परिस्थितीचे चित्रण अतिशय मार्मिक नोंदविले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचा उद्देश सामाजिक न्याय हाच आहे. त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानात देशातील शेतकरी कुळे आणि शेतमजूर या सर्वांच्याच कल्याणाचे जातीनिरपेक्ष पातळीवरून



Scanned with OKEN Scanner